RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ८४] सोमवार, डिसेंबर २२, २०२५/पौष १, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र शासन कार्यनियमावली.**

क्रमांक शाकानि-२०२४/प्र.क्र.८६(१)/रवका-१.— ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी, मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यानुसार, शासकीय अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक शाकानि-२०२४/प्र.क्र.८६(१)/रवका-१, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) द्वारे, मंत्र्यांना विभाग किंवा विभागांचे भाग यांचा प्रभार सोपवून त्याद्वारे शासनाचे कामकाज नेमून दिले होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी, मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यावरून, ॲड. माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा दिनांक १८ डिसेंबर, २०२५ पासून स्वीकारला आहे आणि त्यांना नेमून दिलेले विभाग, श्री. अजित आशाताई अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री यांच्याकडे सोपविलेले आहेत आणि त्या प्रयोजनासाठी, उक्त अधिसूचनेत सुधारणा करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम ५ च्या तरतुदींस अनुसरून, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यावरून, याद्वारे, शासकीय अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक शाकानि-२०२४/प्र.क्र.८६(१)/रवका-१, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेतः-

उक्त अधिसूचनेमधील,—

(एक) श्री. अजित आशाताई अनंतराव पवार यांच्याशी संबंधित असणाऱ्या नोंद ३ मध्ये, स्तंभ (२) मधील, "विभाग किंवा त्यांचे भाग" या शीर्षकाखालील, "राज्य उत्पादन शुल्क" या मजकुरानंतर ",क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(दोन) ॲड. माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे यांच्याशी संबंधित असणारी नोंद २५ वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश अग्रवाल,**
शासनाचे मुख्य सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 22nd December 2025.

*NOTIFICATION*

Maharashtra Government Rules of Business.

No. ROB-2024/C.R.86(1)/O&M-1.—Whereas, the Governor of Maharashtra has, on the advice of the Chief Minister, *vide* Government Notification, General Administration Department, No.ROB-2024/C.R.86(1)/O&M-1, dated the 21st December 2024 (hereinafter referred to as "the said notification"), allotted amongst the Ministers, the business of the Government by assigning Departments or parts of the Departments to the charge of the Ministers;

And whereas, the Governor of Maharashtra has, upon the advice of the Chief Minister, accepted the resignation of Adv. Manikrao Saraswati Shivaji Kokate of his office as Minister with effect from the 18th December 2025 and assigned his Departments to Shri Ajit Ashatai Anantrao Pawar, Deputy Chief Minister and for that purpose, it is expedient to amend the said Notification;

Now, therefore, in pursuance of the provisions of rule 5 of the Maharashtra Government Rules of Business, the Governor of Maharashtra, on the advice of the Chief Minister, is hereby pleased to amend the Government Notification, General Administration Department, No.ROB-2024/C.R.86(1)/O&M-1, dated the 21st December 2024, as follows, namely:-

In the said notification,-

(*i*) in entry 3, relating to Shri Ajit Ashatai Anantrao Pawar, in column (*2*), under the heading "Departments or parts of Departments", after the words "State Excise" the words ",Sports and Youth Welfare, Minorities Development and Aukaf " shall be added;

(*ii*) entry 25, relating to Adv. Manikrao Saraswati Shivaji Kokate, shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.